# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १५८-२३** **दिनांक :- १६/०५/२०२३**

## घरफोडी करणा-या आरोपीतांसह मिळुन घरफोडीचा बनाव करणा-या फिर्यादीच्या कटाचा उलगडा करण्यात गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांना यश.

माणिकपुर पोलीस ठाणेचे हद्दीत दि. ०९/०५/२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वा. ते दि. १०/०५/२०२३ रोजी सकाळी १०.१५ वा. चे दरम्यान गुन्हयातील फिर्यादी सौ. निकहत असगर खान, वय ३८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. बी/२१०, संजेरी अपार्टमेंट, विशाल नगर, वसई प. यांच्या राहत्या घराचे बंद दरवाजाचे लॉक अनोळखी आरोपीत याने कशाचे तरी सहाय्याने उचकटुन घरात प्रवेश करुन बेडरुममधील कपाटाचे व तिजोरीचे लॉक तोडुन तिजोरीमधील १०,३०,०००/- रु किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं. १६७/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्याची माहिती प्राप्त होताच गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाच्या बिल्डींगमधील सी. सी. टी. व्ही. कॅमे-याचे फुटेजची पडताळणी करुन आरोपीतांचे फुटेज प्राप्त केले. गुन्हयाचे घटनास्थळावरील प्राप्त फुटेज व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीतांची नावे निष्पन्न करुन त्यास अटक करण्याकरीता वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके तयार करुन शोध मोहीम सुरु करण्यात आली. सदर गुन्हयातील आरोपीत क्र. ०१) मोहम्मद कमर रौफ खान, वय २८ वर्षे, रा. कमला रमण नगर, झोपडपटटी, रोड नं -१०, बैगनवाडी, गोवंडी, मुंबई यास ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीकडे केलेल्या चौकशीतुन त्याने सदरचा गुन्हा हा त्याचा साथीदार मित्र नामे आरोपी क्र. ०२) नसीम मोईन खान, वय ४० वर्षे, रा.बी/३११, संजरी अपार्टमेन्ट, अंबाडी रोड, विशालनगर, वसई पशिम याचे मदतीने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर आरोपीत ईसम नसीम मोईन खान याचे मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करुन सदर आरोपीतास फाउंटन हॉटेल, घोडबंदर रोड, काशिमिरा येथुन ताब्यात घेण्यात आले.

वर नमुद अटक आरोपीत यांचेकडे केलेल्या तपासामध्ये सदर गुन्हयातील फिर्यादी सौ. निकहत असगर खान, वय ३८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. बी/२१०, संजेरी अपार्टमेंट, विशालनगर, वसई प., ता.वसई, जि. पालघर हीने तिच्या पतीने परदेशातुन वेळोवेळी पाठविलेली रक्कम तिच्याकडुन खर्च झाली असल्याने पती परत आल्यानंतर त्यास खर्च झालेल्या रकमेबाबत

काय सांगायचे या विवंचनेत असताना तिने तिच्या ओळखीचा तिच्या बिल्डींगमध्ये राहणारा इसम नामे नसीम मोईन खान, वय ४० वर्षे, रा.बी/३११, संजरी अपार्टमेन्ट, अंबाडी रोड, विशालनगर, वसई पश्चिम याचेशी संगनमत करुन सदरचा घरफोडी चोरीचा बनाव केला असून सदरचे सोन्याचे दागिने हे फिर्यादी यांनी त्यांचे भावाचे घरी संकेश्वरनगर नालासोपारा पु. येथे लपवुन ठेवले असल्याची महिती निदर्शनास आली. त्यानुसार सदर गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकुण १०,३०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्रीमती पद्मजा बडे, सहा. पोलीस आयुक्त वसई यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २, वसई युनीटचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, मंगेश चव्हाण, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे तसेच माणिकपुर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, स.पो.नि. सचिन सानप, पो.उप.नि. तुकाराम भोपळे, पो.हवा. एस. बी. पाटील, धनंजय चौधरी, श्यामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण, पो.अंम. अनिल कांदे व सहाफौज/संतोष चव्हाण, सायबर शाखा यांनी केली आहे.




--------ooo--------